2373

इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ धुळें.

—: हस्त लिखित ग्रंथ संग्रह :—

ग्रंथ क्रमांक ४३११वे २(२५८)

ग्रंथ नाम अनुभवसार.

विषय मराठी वेदांत.

Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

क्रं.नं-८

१६८॥

# मराठी

## सदानंदशिष्यकृत अनुभवसार

क– [illegible] काशीनाथ देव

४३४ वे:२

" Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai. "

(१)

१०१

अनुभवसारप्रकरणप्रारंभः॥श्री॥१॥
श्रीसच्चिदानंदगुरवेनमः॥श्रीराम॥२॥

" Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai. "

श्रीगणेशायनमः ॥ जयजयसकळनिषेधशेषा ॥ जयजयमायादित्रिगुणअशेषा ॥ जयजयजड
चैतन्यपरेशा ॥ श्रीसदानंदगुरुवरां ॥ १ ॥ नमूनियासद्गुरुचरण ॥ वदावेव्यतिरेकान्वयज्ञान ॥ ऐसी
मतिजालीउत्पन्न ॥ निरूछात्याचीचकी ॥ २ ॥ बहुविस्तारेनबोलतां ॥ संक्षेपेचिश्रवणकरिता ॥ आत्म
बोधविषईचिंता ॥ करणेनलगेमुमुक्षसीं ॥ ३ ॥ अनुबंधचतुष्टयलक्षण ॥ समजोनप्रवृत्तिधरणे ॥ प्र
थमहेचिकारण ॥ तयाचेविवरणआवधारिजे ॥ ४ ॥ साधनचतुष्टयतोअधिकारी ॥ ब्रह्मतेविषयनि
र्धारी ॥ संबंधगुरुशिष्यवैखरी ॥ प्रयोजनतोमोक्ष ॥ ५ ॥ मुख्यसाधनयेविषी ॥ मोक्षापेक्षातिव्रमान
सी ॥ ज्यासतोअधिकारीश्रवणासि ॥ ज्ञानिअज्ञानीयांहेनघडे ॥ ६ ॥ मुमुक्षम्हणावातरी ॥ ऐश्वर्यवि
नावडीअंतरी ॥ आणिज्ञानालागीहोउनिभीकारी ॥ सदाशास्त्रज्ञसेवित ॥ ७ ॥ तयावर्णाश्रमधर्मनिः
काम ॥ करउनईश्वरार्पणाचेवर्म ॥ सांगोनसाधनचतुष्टयनेम ॥ आधिकाराआणिती ॥ ८ ॥ काम्यनि
षिद्धवर्जोनि ॥ नित्यनैमित्तिकप्रायश्चित्तआनी ॥ उपासनासांगोनि ॥ अहंत्यागेईश्वरकर्तासकचविती ॥ ९
काम्यत्यागेस्वर्गनसे ॥ निषिधत्यागेनर्कनगवसे ॥ नित्यनैमित्तिककरितांनस्पर्शे ॥ प्रत्यवायनिगमोक्त ॥ १०
प्रायश्चित्तेदेहादिशुध्यतां ॥ उपासनेनेईश्वरप्रसन्नता ॥ आणिमनयेकायता ॥ सगुणध्यानीहोतसे ॥ ११
तेणेईश्वरानुग्रहहोता ॥ साधनचतुष्टयींआवस्था ॥ इहपरभोगींविरक्तता ॥ वमनसममानित ॥ १२
यिकमोक्षचिआवडे ॥ इतरसकळकाबाड ॥ मानूनमनाचीतडफड ॥ आवरीहाशमम्हणावां ॥ १३ ॥ बा

त्यइंद्रियप्रवृत्ति॥ बळेंआवरूनिधरिती॥ शीतोष्णादिद्वंद्वेसाहाति॥ विषईमनज्यातानरुचोनिफिरें॥
१४॥ गुरुशास्त्रवचनीविश्वास॥ अयाचितलाभिश्रवणीसंतोष॥ आत्मानात्मविवेकिहर्ष॥ सादर
तेथेसर्वदा॥ १५॥ ऐसासाधनचतुष्टयसंपन्न॥ अपरोक्षप्राप्तिस्तवउद्विग्न॥ होत्सातागुरुदर्शन॥ व्हा
वयालागितळमळि॥ १६॥ मगसद्गुरुहुडकुन॥ त्यासमीपजाउन॥ हामोक्षदाताहोयऐसेंचिन्ह॥ त्या
च्यालक्षणीजाणीतले॥ १७॥ अहंममत्वनसे॥ सर्वाभूतिसमदृगीऐसे॥ मैत्र्यादिलक्षणीवसे॥ कृपे
चातोसागरकि॥ १८॥ समीपप्राणीगुरुतेप्रणिपात॥ करिताझालादंडवत॥ परिक्षिस्तवकिंचित॥ नपाह
तीचत्याकडे॥ १९॥ नउठविताउठेना॥ कृपाआलीत्याकरूणाघना॥ आदरेउठउनिज्ञाणा॥ स्वागतपु
सतीतयाते॥ २०॥ अतिविनितहोउनी॥ दोन्हिकरकमळेजोडोनि॥ त्रिविधतापेदग्धलोस्मणोनी॥
शरणआलोस्वामिसी॥ २१॥ तापमात्रामावा॥ जन्ममृत्युनाहिसाचकरावा॥ अखंडअनंदानु
भावा॥ सरताहोयतेकरावे॥ २२॥ गर्भीनरकमुत्रीपचन॥ नाळबंधआधोवदन॥ संकोचस्थळक
ष्टाम्ळकरून॥ कोमळतनूपोळतसे॥ २३॥ प्रसूतकाळिबाहिरनिघतां॥ होतसेप्राणांतव्यथा॥ गर्भ
पातादिखांडुनकाढितां॥ कुंभपाकादिदुःखेयावरिवोवाळिजे॥ २४॥ मृत्युसमइप्राणबाहेरीनिघतां॥
सहस्रवृश्चिकेंताडिलाहोयतळमळता॥ कफवातपीतकंठावरोधतां॥ होउनिमूर्छादारुण॥ २५॥ बाळ
पणीअज्ञानकेवळ॥ दशादिक्षुधेनेतळमळ॥ जाणताहोतांहळहळ॥ वस्त्रभूषणीगोडपदार्थी॥

Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

 

२६॥ तरुणपणीं स्त्रीलंपट ॥ धनविषयाची चटपट ॥ मानापमान निपट ॥ दुःख चि दिसे स्वामियां ॥२७॥
वृद्धपणीं डोळे कान जाती ॥ हस्तपादादि न चलती ॥ बडकेला रुमुत्रें भरती ॥ घरें अस्तरणें हीं ॥ स्त्री
वचन कोणी न मानिति ॥ श्वास नाहीं समयें काकुलती ॥ लवकर मरेना कां ह्मणती ॥ ऐसी फजीती
वृद्धपणीं ॥२९॥ मरणानंतरें यमदंड ॥ नानाप्रकारिचे उदंड ॥ तेथील व्यथा चंड ॥ सांगतां मन भय पा
वे ॥३०॥ तस्मात् मरणापासून जन्म पर्यंत ॥ लव निमिष्य सुखाची ज्यात ॥ नाहीं नाहीं जगाआंत ॥ स्वर्गा
दि करुनी ॥३१॥ यालागि दीन दयाळा ॥ कृपेनें मातें सांभाळा ॥ जन्म मृत्यु वेगळा ॥ होय ऐसें मज क
रीं ॥३२॥ मग शिष्याचें लक्षण ॥ विषईं विरक्त मृदु भाषण ॥ नम्रता दक्षतादि जाणोन ॥ ऐसा स्वामि सितित
यातिं ॥३३॥ सत्समागमी राहतां ॥ प्रश्नसेवादि करितां ॥ आत्मा नाहिं हे निश्चयता होतां ते निः
शेष गेली ॥३४॥ आत्मा कर्ता जगाचा ॥ स्वह घालितो प्रताप त्याचा ॥ ऐसा प्रत्यय येतो साचा ॥ परो
क्षज्ञानाचा आयुभवि ॥३५॥ परोक्ष आत्मा समजला ॥ अपरोक्ष विषीं प्रार्थिता जाला ॥ येथूनि क्र
मत्याचा बोलिला ॥ सद्गुरूराज ॥३६॥ इति अनुभवसारे प्रथम प्रकरण समाप्त ॥१॥ पूर्ण आधिका
र जाणोन ॥ शिष्य सन्मुख बैसऊन ॥ तूं ब्रह्म ऐसें वचन ॥ सांगोन मस्तकीं हस्त ठेविला ॥१॥ तूं ब्रह्म ह्म
णतां संतोष जाला ॥ परि संशय मनीं उद्भवला ॥ ब्रह्म निर्गुण निराकार ते मज ला ॥ सांगतां हे प्रत्य
यास कैसें ये ॥२॥ तव स्वामि ह्मणती ॥ अध्यारोप अपवाद रिती ॥ पाहतां आंतरी प्रतिति ॥ ॐ

यईलतूजनत्वतां ॥ ३ ॥ अध्यारोपतोकवण ॥ आपवादाचिकायम्हुण ॥ हेंपुसोपाहिंतंवआपण ॥ सांग
तेंजालें ॥ ४ ॥ यकआसोनअन्यभासावें ॥ रज्जुआसतांसर्पभासें ॥ दिसेत्यासभ्रांतम्हणावें ॥ तेंसेंब्र
ह्मआसतांजगदिसे ॥ ५ ॥ अध्यारोपतानसोनिदिसावें ॥ आपवादतोकाढिनसावें ॥ हेउत्तरातिल
यावरूनजाणावें ॥ लक्षणद्वयसंज्ञा ॥ ६ ॥ अगोदरनिर्धर्मब्रह्मचिआसें ॥ सदसद्वधानमायादिकां
हीनसें ॥ तेंथेंकाळप्रकृतिहोतसें ॥ तद्योगेईश्वरब्रह्मासचम्हणावें ॥ ७ ॥ काळप्रकृतिजाली ॥ म्ह
णतांद्वयततासंभवली ॥ तरियाचिअहेतिकिळा ॥ विरळाजाणतीगुरुकृपें ॥ ८ ॥ सूर्यापासूनमा
ध्यानिमृगजळ ॥ त्यासमाध्याननिमित्तकाळ ॥ परंतुमाध्यानासमूळ ॥ सूर्यचितिंव्हाउपादानआ
णिनिमित्ततेचिं ॥ ९ ॥ काळाचाहीमहाकाळ ॥ ब्रह्मम्हणावेंकेवळ ॥ तिथेमायामृगजळ ॥ नसोनिभा
सें ॥ १० ॥ मूळमायाब्रह्मव्यापिली ॥ तेथेंस्फूर्तीचिईच्छातेगुणक्षोभिणीजाली ॥ तीयेतेंव्याप्तीअसेचि
पहिली ॥ निर्धर्मचैतन्याची ॥ ११ ॥ जेंजेंतत्वहोतसें ॥ त्यातचैतन्यव्याप्तीपूर्वीचआसें ॥ हिखूणठाउक
आसलियाकेंसें ॥ सर्वब्रह्मनमानिती ॥ १२ ॥ गुणक्षोभिणीपासून ॥ होताजालाअहंकारतोत्रिगुण ॥
त्याच्याशक्तित्रयाचेंआभिधान ॥ वेगळालेजाणावें ॥ १३ ॥ ज्ञानशक्तिसत्वगुणसमवेत ॥ त्यासम्ह
णावेमहतत्व ॥ रजोगुणक्रियाशक्तीयुक्त ॥ तोसूत्रात्माजाणावां ॥ १४ ॥ गुणक्षोभिणीसूत्रात्माप्रकृ

ति॥ अव्यक्त तम आप रा दिसणती॥ महतत्व रुपे सिव दंती॥ परि पर्यायनामं मात्र हां॥ १५॥ अहंकार ता
मस द्रव्यशक्ति॥ पासून पंचतन्मात्रा उत्पत्ति॥ येथूनि त्रिगुणाची व्याप्ती॥ सर्वत्र ब्रह्माचि जे रिती॥ १६॥ श
ब्दा पासून अकाश जाला॥ त्याचा गुण शब्द चि बोलिला॥ अकाशा पासून वायू जाला॥ त्याचा गुण शब्द
स्पर्श॥ १७॥ वायू स्पर्शा पासून जाला दहन॥ त्याचा रूप स्पर्श शब्द गुण॥ आग्निरूपा पासून जीवन॥ रस रू
प स्पर्श शब्द॥ १८॥ आप रसा पासून॥ जाली पृथ्वी निर्माण॥ गंध रस तेज स्पर्श शब्द गुण॥ जीचा ठाई अ
सती॥ १९॥ पंचतन्मात्रा पासून पंचमहाभूतें॥ तें व्हाये के क त्रिगुण आसावा त्यांतें॥ वृद्धिंगत ये केक
आधीक येथें॥ कारण कार्ये पै जालें॥ २०॥ अकाश प्रथम कारण॥ वायु कार्य रूपे उत्पन्न॥ स्वगुण स्प
र्श कारणाचा शब्द जाण॥ असेचि कार्य कारण त्वें येकेक विशेष॥ २१॥ पंचभूतें त्रिगुणात्मक॥ त्याच्या स
त्वांश देवतामय अंतःकरण॥ हि सत्वांशा पासून जाण॥ शब्द स्पर्श रूप रस हे अभिधान॥ तमांश उत्प
ति॥ २२॥ अहंकार चित्त बुद्धि मन अंतःकरण पंचक॥ रजांश पंच त्रिक॥ तमांश विषय पाच॥ २३॥ प्रा
ण पान अपान उदान व्यान समान॥ श्रोत्र त्वचा चक्षु जिव्हा घ्राण॥ वाक्पाणि पाद शिश्न गुद हे जाण
रजा पासोनि॥ २४॥ पंचविंशति तत्वे त्रिगुण जालें॥ त्याचे पिंड ब्रह्मांड उभारिले॥ स्थूळ सुक्ष्म कारण
म्हणितलें॥ महाकारण ते शुद्धसत्व॥ २५॥ स्थूळ देह पाच भूतांचें॥ दशेंद्रिय मन चतुष्टयाचें॥ पंचप्रा
ण असे येकोणिसाचें॥ लिंग देह॥ २६॥ आत्मा न कळे ते हे अज्ञान॥ तेचि महतत्व कारण देहत्र

यसाक्षीआत्मामीजाणणें ॥ निमहाकारणह्मणावें ॥ २७ ॥ प्रकृतीपासूनदेहपर्यंत ॥ सर्वब्रह्मेंअनस्यूत
ह्मेंनणो निभाससत्यमानित ॥ अज्ञानवसें ॥ २८ ॥ यानावअध्यारोपजाणें ॥ ह्मणिजेअन्यथाज्ञान ॥ आ
पवादह्मणिजेसर्वनिरसोन ॥ निर्धर्मआत्माउरीजे ॥ २९ ॥ स्थूळदेहपर्यंतउत्पत्तिजाली ॥ सर्वआत्माअ
सोनआकृतीजाली ॥ याचीप्रक्रियाकळली ॥ पाहिजेआधीं ॥ ३० ॥ घटस्थानीस्थूळजेंलें ॥ त्यातजळे
स्थानीसूक्ष्मउपमिलें ॥ त्यातनभप्रतिबिंबलें ॥ तोजिवात्माबोलिजे ॥ ३१ ॥ घटजळहालतांप्रतिबिंबहा
ले ॥ बींबाकाशाकधीनव्हेचंचळ ॥ तैसाजीवासभोगीदिसेवळमूळ ॥ आत्मानिश्चळआभोक्ता ॥ ३२
असाजीवआज्ञानिभ्रमला ॥ देहासचआपणमानिताजाला ॥ तेणेजन्ममृत्युभोगुलागला ॥ त्याची
सुटकाआत्मबोधें ॥ ३३ ॥ घटभंगतआहे ॥ परिजळतेसेचिआहे ॥ प्रतिबिंबहीदिसोलाहे ॥ जळतो
पर्यंत ॥ ३४ ॥ प्रतिबिंबबिंबीमिळे ॥ मोक्षसंभवतेवेळे ॥ दोगाह्निवाचूनिनाकळे ॥ विचारयाचा ॥ ३५
जळनिःशेषनसावें ॥ किंवाजळबिंबासस्पर्शावें ॥ तेंव्हाचप्रतिबिंबनसभवें ॥ हेंजाणतीआभिज्ञ
३६ ॥ लिंगदेहीमुख्यसत्व ॥ तद्योगेप्रतिबिंबत्व ॥ याचानाशह्मणताअद्वयत्व ॥ प्रत्ययहोयतेंव्हांसं
भवें ॥ ३७ ॥ प्रळईसत्वस्वरूपीमुरे ॥ तेंव्हाप्रतिबिंबहीनुरे ॥ आणिकअरूकाचाप्रकार ॥ प्रतिबिंब
बिंबिमिळणेचा ॥ ३८ ॥ दरडीपोटिपाणीआसे ॥ त्यांतदरडीचेप्रतिबिंबदिसे ॥ पूरयेवोनिपाणीद
रडीवरजातांनदिसे ॥ प्रतिबिंबकाहीं ॥ ३९ ॥ व्यतिरेकेजळनिपटआटे ॥ अन्वयजळबिंबासभेटे

(४)

अनु० ६ सा० प्र० २

सत्संगेयाचीखटपट॥जाणोनस्फखियाहोईजे॥२१॥इतिअनुभवसारेद्वितीयप्रकरणसमाप्तः॥श्री॥
श्रीगणेशायनमः॥आतादेहचतुष्टयनिरूपण॥त्याचेआईकावेलक्षण॥स्थूळदेहजोजाणणे॥पंच
वीसतत्वाचा॥१॥पृथ्वीआपआग्निवायुआकाश॥यायेकेकाचेपाचपाचअंश॥अस्थिनाडीत्वचारो
ममांस॥हेधरणीचेजाणावे॥२॥लाळमूत्रमज्जास्वेदरक्त॥हेआपांशजाणिजेत॥क्षुधातृषाआल
स्यनिद्रामैथुनात॥तेजतत्वापासूनी॥३॥चळणवळणआकोचन॥प्रसारणआणीधावन॥हेवायूपा
सूनिउत्पन्न॥आताआकाशाचेआवधारा॥४॥कामक्रोधशोकमोहाभये॥हेनभापासूनिहोये॥या
पंचविसाचासमुदाय॥त्यातेंदेहतूंम्हणविसिकवण॥५॥पंचवीसायेकासतूंपण॥किंवासर्वास
मिळोन॥त्याचाविचारपाहताजाण॥सर्वहिजड॥६॥होंआपणातेनेणती॥आणिदुसऱ्यातेहिनजा
णती॥मीदेहम्हणणेहेस्फूर्ति॥तेतोवेगळीगमतसे॥७॥तेंतूंज्यासज्ञेदिसते॥तोकैसाहोईलतेंम्ह
णोनिदेहतुजंदृश्यते॥तुज्ञेहूनवेगळे॥८॥हेयेकलक्षण॥दुसरेरितीहिअनुभवघेणे॥स्वप्नीयामांत
रीजाउन॥देहधरूनिविवुहारकरितोसिं॥९॥येकाग्रामीनिजेलापूर्वदेह॥तेसाचदुसऱ्याग्रामीधरीनिः
संदेह॥पहिल्याचीनिःशेषस्मृतिनहोय॥स्वप्नकाळिजयाते॥१०॥जाग्रतीतस्वप्नदेहनसे॥स्वप्नी
नजाग्रतदेहनभासे॥तेंव्हातूंदेहकोणताकैसे॥तेसांगविचारूनि॥११॥पाहताविचारयाचा॥तूंदेह
नव्हेसिजाणतात्याचा॥शास्त्रिहिदेहठसाकल्पनेचा॥देहाहूनभिन्नतूं॥१२॥भावपडेमेदिनी॥जंन

राम ४

बोलतितेक्षणी॥ चालत्ताबोलतागेलानिधोनि॥ लोकिकीहेप्रसिद्ध॥१३॥ स्मृति॥ इंद्रियाणिपराण्याहुरिंद्रिये
भ्यःपरंमनः॥मनसस्तुपराबुद्धिर्योबुधेःपरतस्तुसः॥१॥श्रुति॥ येविषींबोलनाबहुत॥ग्रंथवाढलआत्यांत
सारांशातूंनव्हेसिहासिद्धांत॥श्रुतिस्मृतीअनुभवें॥१४॥ प्रतितीनव्हेप्रतिती॥ज्यासप्रतीततेप्रतिति॥याला
गिंदेहजाणतांप्रतिती॥देहदृश्यप्रतीतज्याची॥१५॥ गृहादिकआपुलेंम्हणावें॥तेआपणनव्हेआपणाहूनपरा
वें॥तैसेंदेहाहुनजाणावें॥स्वरूपआपुलें॥१६॥ निष्पविचारबहुधाकेला॥देह्याहूआपणनिश्चयजमलेला॥
परंतुकैंसातोनाहीकळला॥मार्गीलागलाकरण्याच्या॥१७॥देहनिरसताकायजावें॥प्रत्ययासकाययावें॥
हेसविस्तरऐकावें॥थोडियामाजी॥१८॥मीआपूकवणाचा॥किंवाअभिमानआश्रमाचा॥नामरूपसर्वांचा॥
भावनसावां॥१९॥ कोणत्यावर्णाश्रमाचें॥कर्मकरणेविपासंकोच॥मीकोणकेंसाहेनस्फुरे॥संदेहीपडलाविं
चारीं॥२०॥देहमीनव्हेसाजाला॥परिशुधेतत्पबांधला॥शोकमोहेआकळला॥तेजायकवणरिती॥२१॥
देहनव्हेसाकळला॥मागतीकांआठवमला॥आठवतादेहनिर्वाहाला॥कवणेरितिकरावें॥२२॥ याचेंउत्त
रऐसें॥जोवरीप्रारब्धआसें॥तोपर्यंतदेहननाशें॥कल्पीतआसोनिहीं॥२३॥प्रारब्धेंदेहराहावें॥तें
संचिमीव्हेलतेंखावें॥पूर्वसंस्कारेंकर्मघडावें॥ परिविचारीआसावेंसर्वकाळ॥२४॥तामसअहंकारगेला
राजससात्विकउरला॥तोहिनिरसआरंभिला॥यिथूनीयां॥२५॥पूढेविचारतोऐसा॥जोवरिलिंगदेह

घाठसा॥ नभंगेतोपर्यंतकेंसा॥ भरवसामोक्षमार्गीचां॥ २६॥ लिंगदेहसतराकळाचा॥ ज्ञानकर्मपंचकद्वयाचां
आणिप्राणपंचकद्वयाचा॥ मनबुद्धिसहितसतरां॥ २७॥ कोणीसोळाकळाचाह्मणती॥ त्यातबुद्धिवीनसेगण
ति॥ चित्तअहंकारतन्मात्राधरिताहोति॥ चोविसतत्वें॥ २८॥ ऐसाचोविसाचालिंगदेह॥ त्यातत्वातनूंकोणते
निःसंदेह॥ बराविचारूनपाहें॥ मगसांगअनुभवें॥ २९॥ विचारकरितातयाचां॥ विचारहोतूकाह्याचा॥ प्राणतो
थारादेहिचा॥ नसोडीतकां॥ ३०॥ येकवेळप्राणनिघाला॥ तोपरतोनिनाहिआला॥ हेनघडोनिह्मणानिप्राण
ला॥ प्रतितीनह्मणावें॥ ३१॥ देहिहीप्राणभासतां॥ तोनिद्रिस्तनाहीतत्वतां॥ चोरेआंगावरीलवस्तनेतां॥
कांनिवारीतनाहीं॥ ३२॥ तेंव्हाप्राणासिजडत्व आलें॥ ईंद्रियविषयमेळें॥ रूपयेकमेकाचेंजालें॥ वेगळीहोता
दोन्हिहीजडें॥ ३३॥ विषयनसताईंद्रियनह्मणावें॥ ईंद्रियावाचूनविषयोकेवीगणावें॥ एवंउभयवीयोगें॥
जाणावें॥ दोहींचेंहीजडत्व॥ ३४॥ प्राणईंद्रियविषय॥ हेनव्हेतिप्रतितीभाव॥ अंतःकरणजाणतेहोयें॥ ऐ
साअनुभववाटें॥ ३५॥ पंचभूतनिरासेतमाहाकारगला॥ प्राणेंद्रियविषयनिरासेंराजसनिरसला॥ अंतः
करणीसात्विकउरला॥ तोचिप्रतीतीगमतसें॥ ३६॥ येथेरितीऐसीगमली॥ सर्पभ्रांतीतमनिरासेंगेली
तृवधाराभ्रांतिवाढतीजाली॥ रजतत्वआपणमानितां॥ ३७॥ तेहिनिरसतांरजोभ्रांति॥ धारारोपजा
ऊनकाष्टमति॥ होयहेही विपरीतमती॥ जातानिराससत्वभ्रांतिचां॥ ३८॥ अंतःकरणप्रतितीवाटलें॥



Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai "joint project of"

(11)

तेहि निरसोनि आरंभिला ॥ सुषुप्तीत लीन जालें ॥ तिं ह्या प्रतीत कोठें ॥ ३९ ॥ मन बुद्धि चित्त अहंकार ॥ अंतःकर
णाचि च्यार प्रकार ॥ त्याचा करिता विचार ॥ तेहि जरि ह्मणोनि अगमा पाईं ॥ ४० ॥ मनी संकल्प उठतां ॥ नसे बुद्धिची
निश्चयता ॥ चिंतन होय करिता ॥ तव दोन्हि हीन सती ॥ ४१ ॥ तव अहंकार उठत ॥ तव तिन्हि हीन सती तेथें ॥ एवं
येकु आसतां दुजें न उरत ॥ तिं ह्या च्यारिहीं अगमा पाईं ॥ ४२ ॥ याच हूंत तूं कवण ॥ विचारिता वाटे शुन्य ॥ मग का
हिन कळे ह्मणें ॥ ते महाकारण देह ॥ ४३ ॥ लिंगदेह निरसला ॥ येथें अनुभव काय उरला ॥ तो विसतवें मीन हेप
रिमला ॥ स्वरूप आपुलें कळेनां ॥ ४४ ॥ मन जीकडे जायें ॥ तिकडे वितुकाचि अनुभव होये ॥ आत्म्या वांचून ठायें
क्रिम पिहिन सां ॥ ४५ ॥ सूर्यकांत जिकडे नेला ॥ तिकडे आग्नि पडे वहिला ॥ तैसें जड मन त्याला ॥ प्रकाश आत्मया
चा ॥ ४६ ॥ श्रोता आक्षिप करी ॥ जड आत्मा प्रकाश ह्मण वापरी ॥ अनुभव सयेत री ॥ तैसे मानून नये ॥ ४७ ॥
मन न सें जेथें ॥ आत्मा हीन भासे तेथें ॥ ये का हून येका तें ॥ जाणणें न घडे ॥ ४८ ॥ मनाचा निरास केला ॥ तिं ह्या आ
मन न सें जेथें ॥ आत्मा हीन भासे तेथें ॥ ये का हून येका तें ॥ जाणणें न घडे ॥ ४८ ॥ मनाचा निरास केला ॥ तिं ह्या आ
त्मा हीन दिसे मुळा ॥ ऐसें ह्मणतां शून्यवाद आला ॥ तो निरसिला पाहिजे ॥ ४९ ॥ न कळे ऐसें ह्मणसी ॥ हि कळ
णें कां नेणसी ॥ नेणन्यास न कळे ऐसी ॥ स्फूर्ति कैचि आसे ॥ ५० ॥ सुषुप्तीत जाणणें नाहीं ॥ तैसीच गड दभ्रांति
पाहीं ॥ मूर्छेमध्य ही काहि ॥ अनुभव नसे ॥ ५१ ॥ इत्यादिकी अनुभव नसे ॥ तेथें न कळे हे संभवत आसे ॥ म
जन कळे ह्मणसी तें कैसें ॥ न कळे ह्मणावें ॥ ५२ ॥ न कळे ऐसें ह्मणसी ॥ तो चि तूं न कळण्या जाणसी ॥ बरे विचा

(12)

अनु०
६

सा०प्र०
३

रीमानसी॥ तूंअज्ञानसाक्षी॥५३॥ अज्ञानसाक्षीउमजला॥ तोचिमहाकारणदेहबोलिला॥ तीनदेहदि
सतीत्याला॥ साक्षीनिराळाआपण॥५४॥ साक्षित्वाचासमीरराहतां॥ कूटस्थचिहोयतत्वतां॥ प्रत्यगा
त्मामहाकारणीआसतां॥ देहत्रयविलक्षणमीसाक्षीम्हणे॥५५॥ आणिकूटस्थतेमाझेरूप॥ हेहीज्ञान
णेआरूप॥ चारिदेहनिरासेचिद्रूप॥ केवळउरे॥५६॥ जीवेशोपाधिनिरसतां॥ आत्मानुभवहोयतत्वता
ज्याअनुभवीअहंता॥ नसेलेब्रह्मविद्या॥५७॥ तोहिअनुभवउठतें॥ मगनिर्गुणब्रह्मउरे॥ जेथेज्ञान
णेनिर्णेसरे॥ तेखूणज्ञानीजाणती॥५८॥ देहचतुष्टयनिरासे॥ आत्मत्वउपपादिलेजेंसे॥ पंचकोश
प्रक्रियेकरूनितैसे॥ ज्ञानव्हावेस्वामियां॥५९॥ याचेउत्तरआईकावे॥ अन्नमयज्यासम्हणावे॥ त्याचे
स्थूळदेह्यापरिज्ञाणावे॥ लक्षणउत्पत्तिनिरासा॥६०॥ प्राणमयमनोमयविज्ञानमये॥ तिन्हिमिळोनि
लिंगदेहहोये॥ त्यांतपंचप्राणतोप्राणमय॥ कर्मेंद्रियमनतोमनोमयकोश॥६१॥ ज्ञानेंद्रियबुद्धिविज्ञान
कोश॥ एवंतिन्हिमिळोनतत्वेसप्तदश॥ लिंगदेहहोइतुक्रियाचतत्वास॥ शास्त्रवेत्तेम्हणती॥६२॥ आ
नंदमयसुषुप्तीतेबोलती॥ त्याचिकारणदेहातगणती॥ आत्मानकळोनआनंदरूपआसती॥ दोन्हि
हीठाईं॥६३॥ महाकारणीआत्माकळे॥ तेसाचीसुषुप्तीसाक्षीहोताआकळे॥ एवंकोशदेहउभयमे
ळे॥ विचारऐक्यऐसेदिसे॥६४॥ बिंबप्रतिबिंबजळघर॥ त्याचेहीऐक्यअसेचिस्पष्ट॥ घटस्था

६

Joint project of Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

नीआन्नमयनिपट॥प्राणमनविज्ञानहिजळ॥६५॥घटजळतूंनव्हेसिऐसेसांगता॥प्रतिबिंबहोयविचारक
रिता॥तवआपणकोणहेतत्वतां॥नकळेऐसेम्हणतसे॥६६॥मगसद्गुरुनिरखूणदाविली॥तेंव्हाआत्मसवीप्र
तीतफावली॥एवंकोश्यादेआणिप्रतिबिंबाचीजाळी॥ऐक्यताप्रत्यगात्मत्वीं॥६७॥इतिअनुभवसारेदेह
चतुष्टयनिरसनप्रकरणतृतीयः॥३॥ ॥श्रीगणेशायनमः॥अध्यारोपअपवादबोलिला॥तेणेंआ
त्मत्वनिर्धारजाला॥परिद्वैतसंस्कारनाहिंगेला॥त्यासिपाहिजेअन्वय॥१॥निर्धर्मआत्मासमजला॥सा
धनेंआत्मभावींस्थिरावला॥तेथेंपाहतांद्वैतआला॥ठावचिनाहि॥२॥विषयजगदेहादिक॥नभासेका
न्हियेक॥आनंदाचाहिकळंक॥नसाहेतेथें॥३॥निर्विकल्पींऐसेंघडेते॥परिवृत्तीउठताऐसेंभासतें॥
जडचिआसेअनुभवानयेतें॥तेंव्हाअद्वैतकेवीबोलावें॥४॥याचाऐसाविचार॥जगब्रह्मसाचाकार॥
त्याच्याअनुभवाचाचमत्कार॥अनुभवियासीसमजावें॥५॥रज्जुकळतांसर्पचीभासे॥मिथ्याजाणेंप
रिमृगजळदिसे॥लहरीसमुद्रावेगळीआसोनिभासे॥दोनिहीसमुद्रजळम्हणोनि॥६॥शुक्तिरजत
घटमृत्तिकादिक॥ऐसेंदृष्टांतआसतीआनेक॥तेयथायोग्यपूर्वोक्तत्रिक॥सांगितलात्यासयोजावें
॥७॥ब्रह्मकळतांजगनचदिसावें॥ब्रह्मकळलेंतरीजगदिसतआसावें॥ब्रह्मकळतांब्रह्मअनुभवावें

(14)

अनु० ७

सा०प्र० ४

जडचितन्य सर्वहीं ॥ ८ ॥ निर्गुणी जग सर्वही नसें ॥ कल्पना करितां मानावें जग नाहिं असें ॥ चिदाकाशीं वृत्तिउ
ठतां ऐक्यभासें ॥ हे आनुभवें जाणावें ॥ ९ ॥ आधिव्यतिरेकें आत्मा निर्धर्म जाणावा ॥ मग मायायुक्त ईश्वरत्वा
चा अनुभव घ्यावा ॥ त्या अनुभवें वृत्तीनेच आकार ल्यावा ॥ तिहिंचा जाणावा अनुभव येकरस ॥ ११ ॥ निर्धर्म
ज्ञाने ईश्वरत्वाची ॥ उपलब्धि घडतसे साची ॥ आणि कल्पित आकाराची ॥ तेंव्हां इंद्रियद्वयाची होती तेणे चिकीं
॥ १२ ॥ वृत्ति चैतन्यें चैतन्यघन ॥ तेंव्हां वृत्ति नग ब्रह्मस्वर्ण ॥ वृत्ति नगासि मिथ्यापण ॥ सत्य स्वर्ण ब्रह्म हीं
॥ १३ ॥ वृत्ति ऐसी अनुभवा आली ॥ त्या वृत्तिने जग कल्पना केली ॥ कल्पनाच जग दिसो लागली ॥ तेंव्हां वृत्ति
कल्पना जग ब्रह्म का नव्हे ॥ १३ ॥ सर्वही चैतन्य ऐसें कळतें ॥ तेंव्हां दृष्टांतो अनुभवा येते ॥ उगेच घटपट न
ग उपमेलें ॥ देता माती तंतू हेन कळे ॥ १४ ॥ मातीचाचि घट ॥ तंतूचाचि पट ॥ नग स्वर्णनिपट ॥ हे अनुभ
वास दोनि येती ॥ १५ ॥ कां जे या कार्यकारणाचे ज्ञान आहे ॥ तैसें ब्रह्म अनुभवें ठावें होयें ॥ तरि जग ब्रह्मवि
षई संदेह ॥ राहिला किं कायें ॥ १६ ॥ ये विषईं युक्ति प्रयुक्ती ॥ चित्सुधा राजयोगादि ग्रंथी ॥ श्री वामन शे
षबहुधा युक्ति ॥ श्री सच्चिदानंद कृपें बोलिले ॥ १७ ॥ याचा अनुभव ज्यास घेणें ॥ तेणें षट्समाधी अनुभ
वणे ॥ म्हणिजे स्पष्ट व्यतिरेक अन्वयज्ञान ॥ करतळामळ ॥ १८ ॥ षट्समाधी लक्षण ॥ आचार्यवृंद लक्ष्या
पण ॥ त्याचे धरिना अनुसंधान ॥ साधक धन्य होतसे ॥ १९ ॥ तीन समाधी आंतरी ॥ तैसेचि तिन्ही बाहेरी

राम ७

गुरुमुखेंजाणोनअभ्यासधरी॥तोसाधकसिद्धहोये॥२०॥आंतरीचेसांगोआधि॥दृश्यानुशब्दानुविधनि
र्विकल्पाविधी॥त्यातदृश्यानुविधजाणणेतेबुद्धि॥करूनयेकाग्रएका॥२१॥सकळाचाकरूननिरास॥आपण
व्हावेचिदाकार॥तेथेवृत्तीउठतीत्यास॥साक्षीहोउनिपाहव्यां॥२२॥साक्षीहोउनआसणे॥हेव्यतिरेकलक्ष
ण॥चिन्मयवृत्तिजाणणे॥हाआन्वययोग॥२३॥विगळेपणवृत्तीलक्षणें॥यानावदृश्यानुवीधजाण॥शब्दानु
विद्धचिखुण॥सावधानपरियसां॥२४॥चिदाकारीस्थिरराहतां॥चंचळव्हहोयचित्ता॥तेथेअहंब्रह्मशब्द
उठतां॥अर्थीलक्षआसावें॥२५॥सच्चिदानंदआपण॥निर्विकारनिर्लेपनिरंजन॥अैसेशब्दस्फुरताअनुसं
धान॥शब्दार्थीचेआसावें॥२६॥शब्दानुविधाएवंविधा॥आतानिर्विकल्पाचाबोध॥श्रवणकरावाखेदजे
णेसर्वजातसे॥२७॥चिदाकारीतदाकारहोणें॥दृश्यशब्दकाहिंनसणे॥किमपीहिचंचळपण॥नसोसत
येकाळिं॥२८॥देहादिविश्वतेथेनसे॥विषयकल्पनेचेमूळरूपसे॥शुद्धसत्वमात्रअनुभवीआसे॥त्रिगुण
निरासे॥२९॥यानावनिर्विकल्पसमाधी॥मायामात्रेंनिरासेंसाधिलात्रिशुद्धि॥त्यासबाधानव्हेकधी॥
जन्ममृत्यादिकाची॥३०॥आतांबाह्यसमाधीत्रिविध॥त्याचिभेकाविभेद॥जोंकाबोलिजेदृश्यानुविध॥
प्रथमत्यातनिरोपुं॥३१॥बाह्यदृष्टिविश्वदिसावें॥मनेंकल्पूनअकारपाहवें॥बुद्धिनेंनिश्चयात्मकजाणावें
ब्रह्मस्वरूपत्मणोनिं॥३२॥बधितानुवृत्तिजगपाहवें॥बुद्धिनेनिश्चयात्मकजाणावें॥मृगजळदिसोनि ७

(16)

अनु०
॥ ८ ॥

सा० ग्रं०
॥ ९ ॥

नसावें॥ दृश्यानुवीधसमाधीचें॥३३॥ शब्दानुवीधबाह्य तो ऐसा॥ नामरूपप्रकारनसोनिआठवेमानसा॥
मनोराज्यस्वप्नप्रपंचजेसा॥ मनेचिजालाज्यापरीं॥३४॥ आतांबाह्यनिर्विकल्पलक्षण॥ घटीमातीनगींस
वर्णी॥ नगभासनसोनिनिपटसुवर्ण॥ अनुभवठसासर्वकाळ॥३५॥ एवंदृश्यानुविधामृगजळ॥ शब्दानु
विधास्वप्नजाळ॥ निर्विकल्पासमुवर्णादिज्यळकल्लोळ॥ येकत्वेंप्रत्ययजेरिती॥३६॥ ग्रंथीसांगितलेप्रका
रआचरावें॥ अनुभवानयेतरीरागेंभरावें॥ उगेचमनायेईलतबोलावें॥ हेचतूरताआसो॥३७॥ प्रत्यगात्मा
देहत्रयातें॥ जाणेआणिकूटस्थातें॥ तेंसाचिईश्वरजगब्रह्मातें॥ साक्षित्वेंजाणें॥३८॥ तिसाक्षित्वसोडितां
जीवेश्वराचिऐक्यतां॥ ब्रह्मीहोयतत्वतां॥ मगनिर्गुणमात्रआसे॥३९॥ तिथेत्रिपूटिनसें॥ शुद्धसत्वमायाहि
समरसें॥ केवळभासेयेकरसें॥ जाणीवनेणीवविरहित॥४०॥ सकळशास्त्राचाअभिप्राव॥ अधिष्ठानीहोला
उद्भव॥ तिथेवस्तुत्वनसोनिसद्भाव॥ चेतन्याचाचीळसावा॥४१॥ कापुसापासूनतंतुचा॥ उद्भवतेसावृत्तिचा
तंतूपासुनपटलेवीजगाचा॥ वृत्तिकरूनअनुभव॥४२॥ एवंकापूसदोरापट॥ ब्रह्मवृत्तिआणिजगनिपट॥ स
कळहीयेकनिष्ट॥ आनुभवेंजाणावें॥४३॥ वृत्तिनिमालियापाहीं॥ आधिष्ठानावाचूननसेकाहीं॥ एवंअन्व
यव्यतिरेकरूपतेहि॥ हेचिसमजावें॥४४॥ ग्रंथीसच्चिदानंदाचाअनुभव॥ हेसदानंदस्वरूपचेंवैभव॥ ज्या
सपाहिजेब्रह्मानुभव॥ तेणेचिविचारेंआवलोकिजे॥४५॥ इतिअनुभवसारेचतुर्थप्रकरणसमाप्तः॥४॥ छ॥

राम॥
॥ श्री

Rajawade Samshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai

## मूळ प्रत पाहण्यासाठी संपर्क

---

**इतिहासाचार्य वि.का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे**
राजवाडे पथ, गल्ली नं. १, धुळे-४२४००१ (महाराष्ट्र)
**दूरध्वनी क्रमांक** (०२५६२) २३३८४८
**Email ID** : rajwademandaldhule@gmail.com